## सुविचार

यश मिळवण्यासाठी प्रतिभेपेक्षा सातत्य अधिक महत्त्वाचे असते, प्रामाणिक प्रयत्न आणि संयम हेच अपयशावर मात करून स्वप्नांना प्रत्यक्षात आणण्याची शक्ती माणसाला देतात.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...


### पत्रकार दिनाच्या शुभेच्छा



**पुणे** : मराठी पत्रकारितेचे जनक, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त समाजप्रबोधन, सत्य आणि निर्भीड लेखनाची परंपरा जपणाऱ्या सर्व पत्रकारांना दैनिक राज्य लोकतंत्रच्या वतीने शुभेच्छा देण्यात येत आहेत.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. ६ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १०४ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### अमेरिकेत आंध्रातील जोडप्याचा मृत्यू

**पालकोल्लू :** अमेरिकेत स्थायिक झालेल्या आंध्र प्रदेशातील एका जोडप्याचा वॉशिंग्टनमध्ये झालेल्या रस्ते अपघातात मृत्यू झाला, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. के कृष्ण किशोर (४९), मूळचे पलाकोल्लू येथील रहिवासी, १९९९ मध्ये अमेरिकेत गेले आणि त्यांनी काकीनाडाची रहिवासी आशा (४५) हिच्याशी लग्न केले, जी आधीच तिथे स्थायिक झाली होती. अमेरिकेत स्थायिक झालेले किशोर आणि आशा हे जोडपे रविवारी वॉशिंग्टनमध्ये एका रस्ते अपघातात मृत्युमुखी पडले.

### आग्रा येथे धुक्यामुळे ६ वाहनांची टक्कर

**आग्रा (उत्तर प्रदेश) :** दाट धुक्यामुळे उत्तर प्रदेशातील आग्रा येथील ग्वाल्हेर महामार्गावर सोमवारी सहा वाहनांची टक्कर होऊन दोन जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतांची ओळख विष्णू (५८) आणि इम्रान (४०) अशी झाली आहे. पोलिस उपायुक्त (डीसीपी) पूर्व अभिषेक अग्रवाल यांनी सांगितले की, धुक्यामुळे सोमवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

### आपचे चार आमदार तीन दिवसांसाठी निलंबित

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या उर्वरित तीन दिवसांसाठी आम आदमी पक्षाच्या चार आमदारांना सोमवारी निलंबित करण्यात आले. लेफ्टनंट गव्हर्नर व्ही. के. सक्सेना यांच्या भाषणात व्यत्यय आणल्याबद्दल संजीव झा, सोम दत्त, कुलदीप कुमार आणि जर्नेल सिंग या आमदारांना दंड ठोठावण्यात आला. आपच्या आमदारांनी भाषणात व्यत्यय आणल्याने ही कारवाई झाली.

### निवडणूक पूर्व सर्वेक्षणातील अंदाज समोर

# मुंबईचा महापौर : महायुती की ठाकरे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई : मुंबई महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असून मुंबईचा महापौर कोण होणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईकरांचा कौल नेमका कोणाकडे आहे, याबाबतचा एक नवा सर्व्हे समोर आला असून या आकडेवारीने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे.**

मुंबईचा महापौर मराठीच होणार असे वक्तव्य राज ठाकरे यांनी केले होते, तर दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईचा महापौर महायुतीचा, हिंदू आणि मराठीच होईल असा विश्वास व्यक्त केला आहे. याच वादात आता अमराठी आणि मुस्लिम मतदारांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे. मुंबई महानगरपालिकेत महायुतीला यश मिळेल, असा अंदाज एका चाचणीतून समोर आला आहे. अमराठी मतांच्या जोरावर भाजप आणि शिवसेना ही कामगिरी करतील, असे यात अधोरेखित झाले आहे.

मराठी मतदारांच्या कौलाचा विचार केल्यास, भाजप आणि शिवसेनेच्या महायुतीला ४२ टक्के मराठी मते मिळतील, असा अंदाज आहे. तर दुसरीकडे ठाकरेंची शिवसेना आणि मनसे युतीला ४४ टक्के मराठी मते मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसला केवळ ४ टक्के आणि इतरांना ११ टक्के मराठी मते मिळतील. या आकडेवारीवरून मुंबईत मराठी मतांसाठी ठाकरे बंधू आणि महायुती यांच्यात काँटे की टक्कर पाहायला मिळणार आहे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराने आता जोर पकडला असून, संपूर्ण देशाचे लक्ष या लढतीकडे लागले आहे. सोमवारपासून मुंबईत ठाकरे बंधू तसेच महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या प्रचारसभा सुरू होत आहेत. यंदाची मुंबई महापालिका निवडणूक ठाकरे बंधूंसाठी अस्तित्वाची लढाई मानली जात असून, भाजपने कोणत्याही परिस्थितीत मुंबईत आपलाच महापौर निवडून आणण्याचा निर्धार केला आहे. ठाकरे बंधूंनी विशेषतः मराठी मतदारांवर लक्ष केंद्रीत केले आहे, तर भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मराठींसह उत्तर भारतीय व इतर अमराठी मतदारांना आकर्षित करण्यासाठी स्वतंत्र रणनीती आखली आहे.

या पार्श्वभूमीवर एस इंडिया या संस्थेने मुंबई महापालिका निवडणुकीसंदर्भात एक सर्व्हे प्रसिद्ध केला आहे. या सर्व्हेमध्ये विविध समाजघटकांतील मतदार कोणत्या पक्षाला किती टक्के मतदान करतील, याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सर्व्हेनुसार, मुंबईतील सुमारे निम्मे मराठी मतदार ठाकरे बंधूंच्या बाजूने असतील, मात्र एकूण सत्ता भाजप-शिवसेनेकडे जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अमराठी मतदार मोठ्या प्रमाणात भाजप आणि शिंदे गटाला मतदान करतील, असा दावा या सर्व्हेमध्ये करण्यात आला आहे.

# 'बिनविरोध' विरोधात मनसे न्यायालयात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात महानगरपालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवडून आलेल्यांमध्ये सत्ताधारी महायुतीच्या उमेदवारांचा सर्वात जास्त टक्का आहे. अनेक ठिकाणी विरोधी पक्षातील उमेदवारी अर्ज मागे घेतले तरी काही ठिकाणी उमेदवारांचे अर्ज बाद ठरल्यामुळं उमेदवारांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. या बिनविरोध निवडीवरून राजकारण तापलं असून विरोधकांनी यावर सवाल उपस्थित केला आहे. दरम्यान मनसे आणि काँग्रेसने या निवडीवर सवाल उपस्थित करत थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

मनपा निवडणुकीअगोदर बिनविरोध निवडणुकीविरोधात मनसे नेते अविनाश जाधव आणि काँग्रेसचे समीर गांधी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांना पैसे देऊन आणि दबाव टाकून उमेदवारी मागे घ्यायला भाग पडल्याचा दावा याचिकेत केला आहे. तसेच बिनविरोध संकल्पना लोकप्रतिनिधी कायद्यात नाही असाही दावा याचिकेत केला आहे लोकप्रतिनिधी कायद्यात निवडून आलेले लोकप्रतिनिधी असा स्पष्ट उल्लेख असून बिनविरोध उमेदवारांना पडलेल्या मतांची किमान टक्केवारी निश्चित करण्याची मागणी केली आहे. आयोगाच्या पक्षपातीपणावर बोट ठेवत पारदर्शकतेवरच याचिकेतून सवाल केला आहे.

# बांगलादेशात हिंदूवरील अत्याचार कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेशात हिंदूवर होणारे अत्याचार कायम असून, मागच्या काही दिवसांमध्ये चार हिंदू तरुणांची हत्या करण्यात आली. त्यानंतर आता सामूहिक बलात्काराची घटना समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार हिंदू विधवेवर दोघांनी सामूहिक बलात्कार केला आणि त्यानंतर तिचे क्रूर हाल केले.

बांगलादेश पोलीस म्हणाले, झेनैदाह जिल्ह्यात ही घटना घडली आहे. एका हिंदू विधवा महिलेवर दोघांनी सामूहिक बलात्कार केला. त्यानंतर तिचे केस कापण्यात आले आणि तिला झाडाला बांधून मारहाण करण्यात आली. शाहिन आणि त्याच्या भावाने दुमजली घर विकत घेतलं होतं. त्यानंतर शाहिनची या महिलेवर वाईट नजर होती. त्याने तिला काही अश्लील इशारेही केले होते. शनिवारी संध्याकाळी शाहिन आणि त्याचा साथीदार महिलेच्या घरात घुसला. त्या दोघांनीही तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर तिला झाडाला बांधून तिचे केस कापण्यात आले. या घटनेचा व्हिडीओ तयार करुन तो सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला. महिला अत्याचार सहन करुन बेशुद्ध झाली ज्यानंतर तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले, असे माध्यमांनी दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.

दरम्यान, अतिरिक्त पोलिस अधीक्षक बिलाल हुसेन म्हणाले, आम्ही पीडितेला पोलिस ठाण्यात बोलावून तिची तक्रार नोंदवली आहे. पोलिस त्याच्याविरुद्ध शक्य तितकी कठोर कायदेशीर कारवाई करतील.

### धक्कादायक विधानाने राजकीय वर्तुळात खळबळ

# मी खून करणार होतो... राणेंचे वक्तव्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी कणकवली येथील एका कार्यक्रमात केलेल्या धक्कादायक वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. बाळासाहेब ठाकरेंबद्दलचे जुने किस्से सांगताना राणे यांनी थेट खुनाबद्दल भाष्य केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. मी एका उपशाखाप्रमुखाला ठार मारणार होतो, असे खळबळजनक विधान त्यांनी भर कार्यक्रमात केले. नारायण राणे यांच्या या विधानाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत



आहेत.

कणकवलीतील एका कार्यक्रमात बोलताना नारायण राणे यांनी शिवसेनेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. शिवसेनेत असतानाचे कट्टरपण सांगताना त्यांनी हा प्रसंग सांगितला. मी एका उपशाखाप्रमुखाचा खून करणार होतो, असे राणे यांनी सांगताच सभेत एकच शांतता पसरली.

राणे यांच्या या आक्रमक विधानावर शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी प्रतिक्रिया देताना, त्या काळचे शिवसैनिक असेच कट्टर असायचे, असे म्हणत राणेंची पाठराखण केली आहे. मात्र, एकेकाळी राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवलेल्या नेत्याने असे विधान केल्याने चर्चेला उधाण आले आहे.

नारायण राणे यांचा राजकीय प्रवास नेहमीच संघर्षाचा आणि वादांचा राहिला आहे. १९९१ मध्ये सिंधुदुर्गातील काँग्रेस नेते श्रीधर नाईक यांच्या हत्येप्रकरणी राणे यांच्यावर गुन्हा दाखल झाला होता, मात्र १९९७ मध्ये त्यांची यातून निर्दोष मुक्तता झाली होती. त्यानंतर २००२ मध्ये राष्ट्रवादीचे कार्यकर्ते सत्यविजय भिसे यांची हत्या झाली, तेव्हा राणे विरोधी पक्षनेते होते. या घटनेनंतर राणे यांच्या कणकवलीतील घराची जाळपोळ झाली होती. त्यावेळी शिवसेनेचा कोणताही मोठा नेता आपल्या मदतीला आला नाही, ही सल आजही राणेंच्या मनात असल्याचे बोलले जाते आणि येथूनच ते शिवसेनेपासून दुरावल्याचे मानले जाते.

शिवसेनेत असताना नारायण राणे यांनी मुख्यमंत्रीपद, महसूलमंत्री आणि विरोधी पक्षनेते अशी महत्त्वाची पदे भूषवली. हे सर्व वैभव आपल्याला बाळासाहेबांमुळेच मिळाल्याचे ते आजही अभिमानाने सांगतात. मात्र, २००४ मध्ये त्यांनी शिवसेनेत पदांचा बाजार चालतो असा आरोप केला आणि २००५ मध्ये ते पक्षाबाहेर पडले.

त्यानंतर काँग्रेस आणि स्वतःचा स्वाभिमान पक्ष असा प्रवास करत ते भाजपमध्ये स्थिरावले. भाजपमध्ये आल्यावर त्यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर सातत्याने कडाडून टीका केली आहे. विशेषतः दिशा सालियन प्रकरणात त्यांनी आदित्य ठाकरेंवर केलेले आरोप प्रचंड गाजले होते.

# आंध्र प्रदेशात ओएनजीसी प्रकल्पात आग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अमरावती :** आंध्र प्रदेशातील आंबेडकर कोनसीमा जिल्ह्यातील तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाच्या (ओएनजीसी) तेल विहिरीच्या गॅस पाइपलाइनमधून सोमवारी सकाळी गळती होऊन आग लागली, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात घबराट पसरली आणि या भागातील दोन गावे स्थलांतरित झाली. ओएनजीसीच्या मोरी-५ विहिरीचे संचालन करणारी कंपनी दीप इंडस्ट्रीज लिमिटेडच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेत अद्याप कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मलिकिपुरम मंडळातील इरुसुमांडा गावात असलेल्या विहिरीच्या दुरुस्तीच्या कामादरम्यान ही घटना घडल्याचे वृत्त आहे.

दुरुस्तीच्या कामाचा भाग म्हणून डीप इंडस्ट्रीज कंपनीचे कामगार खोदकाम करत असताना, एका शक्तिशाली स्फोटामुळे कच्च्या तेलात मिसळलेला वायू मोठ्या प्रमाणात बाहेर पडला, त्यानंतर वायू पांढऱ्या धुक्यासारखा पसरला. सुरुवातीला, त्यांनी पांढऱ्या, धुक्यासारख्या वायूला धुके समजले. गळती झालेल्या गॅसने लवकरच पेट घेतला आणि घटनास्थळी मोठ्या ज्वाळा पसरल्या. गावातील काही भागांमध्ये दाट धुराचे लोट पसरले, ज्यामुळे रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

जिल्हाधिकारी महेश कुमार रविराला, पोलिस अधीक्षक राहुल मीना आणि इतर अधिकारी घटनास्थळी पोहोचले. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनांनुसार, महसूल अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना स्थलांतरित करण्याचे आदेश दिले. शेजारच्या इरुसुमांडा आणि लक्कावरम गावातील रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. स्थलांतरितांची संख्या त्वरित उपलब्ध नाही. आग विझवण्यासाठी सध्या सुमारे १० अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी आहेत.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी आगीच्या दुर्घटनेची चौकशी केली आणि अधिकाऱ्यांना आग विझवण्याचे काम प्राधान्याने करण्याचे निर्देश दिले. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि घटनेचे कारण तपासण्यासाठी ओएनजीसीचे अधिकारीही घटनास्थळी पोहोचले आहेत.

एका प्रेस रिलीजमध्ये ओएनजीसीने म्हटले आहे की, वेल मोरी-५ येथे वर्कओव्हर ऑपरेशन्स दरम्यान गॅस गळतीची घटना पीईसी ऑपरेटर, दीप इंडस्ट्रीज लिमिटेडने मोरी फील्डमध्ये नोंदवली आहे. ही विहीर एका दुर्गम भागात आहे, सुमारे ६०० मीटरच्या परिघात मानवी वस्ती नाही. बाधित क्षेत्राला वेढा घालण्यात आला आहे, शीतकरण कार्य सुरू करण्यात आले आहे आणि ओएनजीसीने त्यांच्या संकट व्यवस्थापन पथकांना (सीएमटी आणि आरसीएमटी) तैनात केले आहे, असे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. विहिरीचे नियंत्रण आणि आवश्यकता असल्यास, विहिरीचे कॅपिंग सुलभ करण्यासाठी तयारीचे काम सुरू आहे. ओएनजीसीने आंतरराष्ट्रीय विहिरी नियंत्रण तज्ज्ञांशी समन्वय साधण्यास सुरुवात केली आहे, असेही त्यात म्हटले आहे.

# दिल्ली उच्च न्यायालयाचा लालू यादवांना दणका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आयआरसीटीसी घोटाळ्याशी संबंधित प्रकरणात बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्या याचिकेवर आज सोमवार दि. ५ जानेवारी रोजी दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने लालू यादव यांच्या याचिकेवरील कनिष्ठ न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. उच्च न्यायालयाने सीबीआयला उत्तर दाखल करण्यास सांगितले आहे. पुढील सुनावणी १४ जानेवारी रोजी होईल.

लालू यादव यांनी कनिष्ठ न्यायालयाच्या त्या आदेशाला आव्हान दिले आहे, ज्यात त्यांच्याविरुद्ध आरोप निश्चित करण्यात आले होते. दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने १३ ऑक्टोबर रोजी लालू-राबडी आणि तेजस्वी यादव यांना आयआरसीटीसी घोटाळ्यात आरोपी मानले आहे. हे प्रकरण त्यावेळचे आहे जेव्हा लालू प्रसाद यादव केंद्र सरकारमध्ये रेल्वे मंत्री होते. आरोप आहे की, त्यांच्या कार्यकाळात आयआरसीटीसीअंतर्गत काही हॉटेल्स आणि त्यांच्याशी संबंधित जमिनी खासगी कंपन्यांना नियमांकडे दुर्लक्ष करून भाडेपट्ट्यावर देण्यात आल्या. तपास यंत्रणांचा दावा आहे की, या प्रक्रियेत पारदर्शकतेचे पालन केले गेले नाही आणि यामुळे काही खासगी कंपन्यांना अयोग्य फायदा झाला. दिल्लीच्या राउज अ‍ॅव्हेन्यू न्यायालयाने १३ ऑक्टोबर रोजी लालू यादव, राबडी देवी आणि तेजस्वी यादव यांना आयआरसीटीसी घोटाळ्यात आरोपी मानले. आता तिघांविरुद्ध खटला चालणार आहे. न्यायालयाने म्हटले लालू यांना माहिती असताना निविदा घोटाळ्याचे संपूर्ण कटकारस्थान रचले गेले. निविदेत त्यांचा हस्तक्षेप होता. यामुळे लालू कुटुंबाला फायदा झाला, असेही निरीक्षण नोंदवले आहे.

# हसीना यांच्यावर २१ तारखेला आरोप निश्चिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ढाका :** बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर देशद्रोहाचा गंभीर खटला सुरू आहे, ज्यामध्ये त्यांच्यावर अंतरिम सरकार अस्थिर करण्याचा कट रचल्याचा आरोप आहे. ढाका न्यायालयाने आरोप निश्चित करण्यासाठी २१ जानेवारी ही तारीख निश्चित केली आहे. हा खटला अवामी लीगशी संलग्न असलेल्या "जॉय बांगला ब्रिगेड" च्या ऑनलाइन बैठकीशी संबंधित आहे, ज्यामध्ये हसीनासह शेकडो लोक सहभागी झाले होते असे म्हटले जाते. प्राध्यापक मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारच्या उदयास आलेल्या मोठ्या विद्यार्थी चळवळीनंतर ऑगस्ट २०२४ मध्ये हसीना देश सोडून भारतात पळून गेली. या प्रकरणात एकूण २८६ लोक आरोपी आहेत आणि हसीनासह बहुतेक फरार आहेत.

एका न्यूज पोर्टलनुसार, हसीना आणि शेकडो अवामी लीग



सदस्यांनी डिसेंबर २०२४ मध्ये "जॉय बांगला ब्रिगेड" नावाच्या गटाच्या ऑनलाइन बैठकीत भाग घेतला होता. बैठकीदरम्यान, त्यांनी मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकार उलथवून टाकण्याचा कट रचल्याचा आरोप आहे. हा गट अवामी लीगचा आणि हसीनाचे वडील शेख मुजीबुर रहमान यांच्या वारशाचा कट्टर समर्थक आहे. सुनावणीनंतर, विशेष न्यायाधीश अब्दुस सलाम यांनी हसीना आणि इतर २८५ जणांविरुद्ध आरोप निश्चित करण्यासाठी २१ जानेवारीची तारीख निश्चित केली.

विद्यार्थ्यांच्या हिंसक निदर्शनांनंतर ५ ऑगस्ट २०२४ रोजी हसीना बांगलादेशातून भारतात निघून गेल्या. त्याच वर्षी ८ ऑगस्ट रोजी युनूस यांनी अंतरिम सरकारचे प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. गेल्या वर्षी मार्चमध्ये गुन्हे अन्वेषण विभागाने हा खटला दाखल केला होता, ज्याने ३० जुलै रोजी २८६ आरोपींची नावे आरोपपत्र दाखल केली होती. वृत्तानुसार, न्यायालयाने १४ ऑगस्ट रोजी आरोपपत्र स्वीकारले आणि आरोपींविरुद्ध अटक वॉरंट जारी केले. ११ सप्टेंबर रोजी प्रवास बंदी घालण्यात आली, तर १४ ऑक्टोबर रोजी न्यायालयाने वर्तमानपत्रांमध्ये नोटीस प्रकाशित करण्याचे आदेश दिले, ज्यात हसीनासह २६१ फरार आरोपींना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये हा खटला ढाका मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट कोर्टातून ढाका मेट्रोपॉलिटन सेशन्स कोर्टात वर्ग करण्यात आला. गेल्या वर्षी विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखालील निदर्शनांवर सरकारने केलेल्या कारवाईबद्दल मानवतेविरुद्धच्या गुन्ह्यांसाठी विशेष आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणाने नोव्हेंबरमध्ये हसीनाला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली.

### कायदेशीर कारवाई करण्याचा आयोगाला दिला इशारा

# एसआयआर विरोधात ममता बॅनर्जी आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) ज्ञानेश कुमार यांना पत्र लिहून एसआयआरचा वापर थांबवण्याची विनंती केल्यानंतर काही दिवसांनी एसआयआर प्रक्रियेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचा दावा केला.

"आयोग व्हॉट्सअ‍ॅप मेसेज शेअर करण्यावर आधारित काम करत आहे. त्यांनी व्हॉट्सअ‍ॅप अधिकाऱ्यांना विकत घेतले आहे की नाही हे मला माहित नाही पण आम्ही आयोगाची ही पद्धत सहन करणार नाही," ममता म्हणाल्या.



सागर बेटाला जोडण्यासाठी मुरीगंगा नदीवरील सुमारे ५ किमी लांबीच्या पुलाची पायाभरणी करताना त्यांनी हे भाष्य केले. सागर बेटावर दरवर्षी गंगासागर मेळा भरतो. "आम्ही एसआयआर मुद्द्याविरुद्ध न्यायालयात जाऊ. आम्ही याचिका दाखल करण्यासाठी न्यायालयात जात आहोत. गरज पडल्यास मी स्वतः लोकांच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडेन," असे त्या म्हणाल्या. उल्लेखनीय म्हणजे, ममता यांनी कलकत्ता विद्यापीठाच्या अंतर्गत दक्षिण कलकत्ता महाविद्यालयातून एलएलबीचा अभ्यासक्रम देखील केला आहे.

३ जानेवारी रोजी सीईसीला लिहिलेल्या पत्रात ममता यांनी असा आरोप केला आहे की, या प्रक्रियेचे वर्णन वेळेनुसार केले जात असले तरी, स्पष्टपणे परिभाषित, पारदर्शक किंवा एकसारख्या लागू होणाऱ्या वेळापत्रका नाहीत. वेगवेगळी राज्ये वेगवेगळे निकष पाळत आहेत आणि वेळापत्रकांमध्ये अनियंत्रितपणे बदल केले जात आहेत, ज्यामुळे स्पष्टता, तयारी आणि प्रक्रियात्मक समजुतीचा स्पष्ट अभाव दिसून येतो. धक्कादायक म्हणजे, जवळजवळ दररोज, वारंवार व्हॉट्सअ‍ॅप संदेश आणि मजकूर संदेशांसारख्या अनौपचारिक माध्यमांद्वारे गंभीर सूचना जारी केल्या जात आहेत, असे चार पानांच्या पत्रात म्हटले आहे. एवढ्या मोठ्या आणि संवैधानिक महत्त्वाच्या अंमलबजावणीसाठी कोणतेही योग्य लेखी सूचना, परिपत्रके किंवा वैधानिक आदेश अनिवार्य नाहीत, असे पत्रात पुढे म्हटले आहे. त्यांनी असा आरोपही केला की कामाच्या ताणामुळे आणि एसआयआरमुळे निर्माण होणाऱ्या चिंतेमुळे लोक आरोग्याच्या समस्यांना बळी पडत आहेत.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस बंगालमध्ये सुरू असलेल्या एसआयआर मोहिमेमागे केंद्रातील भाजप सरकारचा हात असल्याचा आरोप करत आहे. भाजपवरील तृणमूल काँग्रेसच्या आरोपांना खोडून काढत, पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी पत्रकारांना सांगितले की, ममता सरकारने एसआयआर प्रक्रियेला विरोध केल्यानंतर त्यांनी काय केले हे बंगालच्या लोकांना जाणून घ्यायचे आहे. बिहारमध्येही ज्या दिवशी ही प्रक्रिया सुरू झाली त्या दिवसापासूनच देशात ही प्रक्रिया सुरू झाली. त्यांचे आरोप निराधार आहेत. आयोग सर्व तयारी आणि योजनांची काळजी घेत ही प्रक्रिया राबवत आहे, असे ते म्हणाले.

# ठाकरे बंधूंची यादी जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) कडून आतापर्यंत अंतिम ५३ जणांची यादी जाहीर करण्यात आली आहे. मुंबई महापालिकेत शिवसेना ठाकरे गटासोबत मनसेची युती आहे. या युतीमध्ये एकूण २२७ जागांपैकी मनसे ५३ जागा लढवणार आहे. राज ठाकरेंनी यशवंत किल्लेदार यांच्यासह कस्तुरी रोहेकर, शैलेंद्र मोरे, बबन महाडिक, मुकेश भालेराव यांच्यासह ५३ जणांना संधी दिली आहे. मुंबईसह राज्यातील एकूण महापालिकांमध्ये १५ जानेवारीला मतदान होणार आहे. तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी होईल.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र मुंबई महानगपालिकेची निवडणुक लढवणार आहे. मुंबई महानगरपालिकेत २२७ साठी मतदान होणार आहे. दरम्यान, मुंबईत भाजपा आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला कडवी झुंज देण्यासाठी ठाकरे बंधूंनी कोणाकोणाला संधी दिली, मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडून कोणाला उमेदवारी मिळाली, याची संपूर्ण यादी समोर आली आहे.

राज आणि उद्धव ठाकरे या दोन ठाकरे भावांनी २४ डिसेंबर रोजी ऐतिहासिक युतीची घोषणा केली आहे. मुंबईच्या राजकारणात नवी समीकरणे जन्माला आली. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत आता 'ठाकरे बंधू विरुद्ध महायुती' असा थेट सामना रंगणार आहे. मुंबई महापालिकेची सत्ता हस्तगत करण्यासाठी ११४ हा बहुमताचा आकडा गाठणे आवश्यक आहे. मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीत भाजप आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना (महायुती) एकत्र लढणार आहे.

# संपादकीय

## निवडणुका महासत्तांचा हस्तक्षेप

**आंतरराष्ट्रीय राजकारणात बलाढ्य देशांकडून तुलनेने दुर्बल देशांमध्ये केला जाणारा हस्तक्षेप हा नियमांची चौकट तोडूनच होतो. संयुक्त राष्ट्रांनी प्रत्येक राष्ट्राला दिलेला सार्वभौमत्वाचा अधिकार अशा घटनांनी शांततेचा भंग करणारे ठरते. म्हणूनच, अशा घटनांना विरोध हा व्हायलाच हवा.**

आंतरराष्ट्रीय राजकारणात बलाढ्य राष्ट्रांकडून दुर्बल किंवा अस्थिर राष्ट्रांमध्ये हस्तक्षेप करणे ही नवीन बाब राहिलेली नाही. मात्र, अशा हस्तक्षेपांचे स्वरूप, उद्दिष्टे आणि त्यामागील कायदेशीर-नैतिक आधार यावर नेहमीच वाद निर्माण होताना दिसून येतात. विशेषतः एखादे शक्तिशाली राष्ट्र स्वतःच्या राजकीय किंवा आर्थिक हितसंबंधांसाठी दुसऱ्या देशाच्या अंतर्गत घडामोडींमध्ये थेट किंवा अप्रत्यक्ष हस्तक्षेप करते, तेव्हा आंतरराष्ट्रीय कायदा, सार्वभौमत्व आणि लोकशाही मूल्ये धोक्यात येण्याची शक्यता वाढते. सर्वप्रथम, आंतरराष्ट्रीय कायद्याचा प्रश्न हा महत्त्वाचा ठरतो. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेनुसार प्रत्येक राष्ट्राला सार्वभौमत्वाचा अधिकार असून, बाह्य हस्तक्षेप हा केवळ अत्यंत मर्यादित परिस्थितीतच योग्य ठरू शकतो. यात मानवी हक्कांचे गंभीर उल्लंघन किंवा आंतरराष्ट्रीय शांततेला थेट धोका यांचा समावेश करता येईल. तथापि, अनेकदा लोकशाहीची पुनर्स्थापना, मानवी हक्कांचे संरक्षण किंवा राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न अशा कारणांचा सोयिस्कररित्या वापर करून थेट हस्तक्षेप केला जातो. प्रत्यक्षात तो कायदेशीर चौकटीचे उल्लंघन करणारा असतो. अशा वेळी कायदा आणि सत्ता यांच्यातील संघर्ष स्पष्टपणे दिसून येतो. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जागतिक सत्तासंतुलन. जेव्हा एखादे प्रभावशाली राष्ट्र नियम डावलून कृती करते, तेव्हा इतर राष्ट्रांनाही तसे करण्याचा अप्रत्यक्ष संदेश दिला जातो. परिणामी, बहुपक्षीय व्यवस्था कमकुवत होते आणि आंतरराष्ट्रीय संस्थांची विश्वासार्हताही पणाला लागते. नियम सर्वांसाठी समान, हा सिद्धांत केवळ कागदावरच राहतो. यामुळे जागतिक राजकारणात अराजकतेची भावना वाढू शकते, जी दीर्घकालीन स्थैर्यासाठी घातक अशीच ठरते. तिसरा आणि सर्वात संवेदनशील पैलू म्हणजे त्या देशातील नागरिकांवर होणारा परिणाम. बाह्य दबाव, आर्थिक निर्बंध किंवा राजकीय अस्थिरता यांचा थेट फटका सामान्यजनांना बसतो. रोजगाराच्या संधी कमी होतात, महागाई वाढते, आरोग्य व शिक्षण व्यवस्था कोलमडते आणि मानवी हक्कांचे उल्लंघन होण्याची शक्यता वाढीस लागते. अशा परिस्थितीत लोकहितासाठी हस्तक्षेप केला असल्याचा दावा केला असला, तरी त्याचे प्रत्यक्ष परिणाम हे अनेकदा लोकविरोधी ठरतात. यासोबतच, लोकशाहीच्या संकल्पनेवरही प्रश्नचिन्ह उभे राहते. लोकशाही म्हणजे जनतेला स्वतःचे भविष्य ठरवण्याचा अधिकार. बाह्य शक्तींनी राजकीय नेतृत्व ठरवणे किंवा सत्तांतर घडवून आणण्याचा प्रयत्न करणे हे या मूलभूत तत्त्वाच्याच विरोधात जाते. अशा प्रक्रियेतून निर्माण झालेली सत्ता ही टिकाऊ किंवा लोकमान्य ठरण्याची शक्यता फारच कमी असते. त्यामुळे दीर्घकालीन अस्थिरता वाढीस लागते. भविष्यातील दृष्टीने पाहता, अशा हस्तक्षेपांचे दूरगामी धोके हे स्पष्टपणे दिसून येतात. आंतरराष्ट्रीय नियमांची अवहेलना ही सवय बनल्यास जागतिक सहकार्याची संकल्पनाच दुर्बल होईल. संघर्षांचे शांततापूर्ण निराकरण करण्याऐवजी सत्ता आणि दबाव यांनाच महत्त्व दिले जाईल. याचा परिणाम केवळ संबंधित देशापुरता मर्यादित न राहता संपूर्ण जागतिक व्यवस्थेवर होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय राजकारणात विवेक, कायदेशीरता आणि नैतिकता यांचा समतोल राखणे हा अत्यावश्यक असाच. तात्कालिक राजकीय किंवा आर्थिक फायद्यांसाठी नियम मोडणे हे स्वतःच्याच हिताला मारक ठरू शकते. त्यामुळे कोणत्याही राष्ट्राने अन्य देशात हस्तक्षेप करण्यापूर्वी त्याचे कायदेशीर, मानवी आणि जागतिक परिणाम गांभीर्याने विचारात घेणे आवश्यक आहे. केवळ शक्तीच्या जोरावर नव्हे, तर नियम, संवाद आणि सहकार्याच्या माध्यमातूनच आंतरराष्ट्रीय स्थैर्य साध्य होऊ शकते, असे आज व्हेनेझुएलातील परिस्थिती पाहता निश्चितपणे म्हणता येते. नवी जागतिक रचना विषद करणारी ही घटना असून, संयुक्त राष्ट्रांसमोर तिने आव्हान उभे केले आहे.

# स्थलांतरित, झुंडशाही आणि नवी आव्हाने

**भारतात स्थलांतरितांविषयी वाढत चाललेली असहिष्णुता आणि काही ठिकाणी दिसणारी झुंडशाही ही कायदा-सुव्यवस्थेची समस्या नसून, समाजाच्या मानसिकतेचा आरसा आहे. रोजगार, ओळख आणि राजकीय भाष्य यांच्या गुंतागुंतीतून हा प्रश्न अधिक तीव्र होत चालला आहे.**



भारतीय समाजाची रचना ही स्थलांतराच्या प्रवाहांवर उभी असून, ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर असो वा आंतरराष्ट्रीय स्तरावरून येणारे कामगार, हे सारेच देशाच्या अर्थव्यवस्थेचे आणि सामाजिक वास्तवाचे महत्त्वाचे असेच घटक आहेत. मात्र, अलीकडच्या काही वर्षांत स्थलांतरितांविषयी वाढत चाललेली असहिष्णुता, संशय आणि काही ठिकाणी दिसणारी झुंडशाही ही चिंतेची बाब ठरत आहे. स्थलांतरितांविरोधातील हिंसाचाराच्या घटना केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न न राहता, समाजाच्या मानसिकतेचा आरसा बनत चालल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर स्थलांतरितांविषयी निर्माण होणारी भीती नेमकी कुठून येते, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. रोजगाराच्या संधी मर्यादित होत असताना, नागरी सुविधांवर ताण वाढत असताना आणि आर्थिक असुरक्षितता तीव्र होत असताना, समाजात 'परक्या'विषयी दोषारोप करण्याची प्रवृत्ती वाढते. स्थलांतरित हे सहज लक्ष्य ठरतात. त्यांच्या वेगळ्या भाषा, राहणीमान किंवा सांस्कृतिक ओळखी यांचा वापर करून त्यांना 'बाहेरील' ठरवले जाते. ही विभागणी सामाजिक ऐक्याला तडे देणारी ठरते.

या प्रक्रियेत राजकीय संवाद महत्त्वाची भूमिका बजावतो. लोकशाहीत मतभेद स्वाभाविक असले तरी, जेव्हा राजकीय भाष्य असुरक्षिततेची भावना चिथावते, तेव्हा त्याचे परिणाम गंभीर होतात. स्थलांतरितांना गुन्हेगारी, संसाधनांवरील ताण किंवा सांस्कृतिक धोका म्हणून रंगवले गेले, तर समाजातील तणाव वाढतो. काही वेळा अशा वक्तव्यांना थेट हिंसाचाराची जोड मिळते. जमावशाहीला मिळणारे मौन समर्थन किंवा उशिरा होणारी कारवाई ही स्थिती अधिकच बळकट करते.

स्थलांतरितांविरोधातील हिंसाचाराचे स्वरूप केवळ शारीरिक हल्ल्यांपुरते मर्यादित राहत नाही. धमक्या, सामाजिक बहिष्कार, घरांवर किंवा दुकानांवर हल्ले, सार्वजनिक ठिकाणी अपमानास्पद वर्तन या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम स्थलांतरितांच्या दैनंदिन जीवनावर होतो. भीतीच्या वातावरणात जगणे हीच त्यांची रोजची अपरिहार्य वास्तविकता बनते. याचा परिणाम त्या व्यक्तींवरच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबांवर, मुलांच्या शिक्षणावर आणि एकूणच स्थानिक अर्थव्यवस्थेवर होतो.

या संदर्भात कायदा आणि न्यायव्यवस्थेची भूमिका निर्णायक ठरते. द्वेषाधारित गुन्ह्यांची नोंद, चौकशी आणि शिक्षेची प्रक्रिया प्रभावी नसेल, तर दोषींना अप्रत्यक्ष अभय मिळते. पीडितांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढते आणि समाजाला चुकीचा संदेश जातो. कायदा सर्वांसाठी समान आहे, हा विश्वास डळमळीत झाला की लोकशाहीची पायाभरणीच कमकुवत होते.

माध्यमांची जबाबदारीही येथे तितकीच महत्त्वाची आहे. स्थलांतराचा प्रश्न मांडताना बातम्यांचे फ्रेमिंग समाजाच्या दृष्टिकोनावर परिणाम करते. एखादी घटना व्यापक संदर्भाशिवाय, सनसनाटी पद्धतीने मांडली गेली तर भीती आणि गैरसमज वाढतात. सामाजिक माध्यमांवरील अफवा, अपूर्ण माहिती आणि व्हिडिओ क्लिप्स वेगाने पसरतात. सत्य तपासण्याआधीच प्रतिक्रिया उमटतात आणि त्यातून हिंसाचाराला खतपाणी मिळते. त्यामुळे माध्यम साक्षरतेची गरज अधिक तीव्रतेने जाणवते.

उपायांच्या दृष्टीने पाहता, हा प्रश्न एका उपायाने सुटणारा नाही. धोरणात्मक पातळीवर स्थलांतरितांच्या सुरक्षेसाठी स्पष्ट आणि समन्वयित भूमिका आवश्यक आहे. रोजगार, निवास, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष केल्यास तणाव वाढतच राहील. द्वेषाधारित गुन्ह्यांवर जलद आणि निष्पक्ष कारवाई, पीडितांसाठी पुनर्वसन व्यवस्था आणि स्थानिक प्रशासनाची संवेदनशीलता हे तातडीचे उपाय ठरतात.

दीर्घकालीन उपाय म्हणून शिक्षण आणि सामाजिक संवाद हा महत्त्वाचा ठरतो. विविधतेचा स्वीकार, सहअस्तित्वाची मूल्ये आणि घटनात्मक अधिकार यांची जाणीव लहान वयापासून रुजवणे आवश्यक आहे. स्थानिक समुदाय आणि स्थलांतरित यांच्यात संवाद वाढवणारे उपक्रम, सांस्कृतिक आदान-प्रदान आणि सामायिक समस्यांवर संयुक्त उपाय शोधणे हे सामाजिक सलोख्यासाठी उपयुक्त ठरू शकते. शेवटी, स्थलांतरितांविषयीचा प्रश्न हा केवळ 'ते' आणि 'आपण' असा सरळ नाही. तो लोकशाही, समानता आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूलभूत मूल्यांशी जोडलेला आहे. असहिष्णुतेचा मार्ग समाजाला तात्पुरता दिलासा देईल कदाचित, पण दीर्घकालीन अस्थैर्य निश्चित आहे.

प्रश्न असा आहे की, भीतीवर आधारलेली राजकारणे स्वीकारायची की विवेक, तथ्य आणि सहअस्तित्वावर आधारलेला समाज घडवायचा? या प्रश्नाचे उत्तरच भारताच्या सामाजिक भवितव्याची दिशा ठरवेल, हे नाकारता येत नाही.

# दिव्यांग बांधवांनी दिला लोकशाहीचा सशक्त संदेश

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मतदान जनजागृती अभियान

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो... माझं मत, माझा अधिकार... मतदान हा हक्क आमचा, लोकशाहीचा अभिमान आमचा... या घोषणांच्या गजरात दिव्यांग मतदारांनी लोकशाहीच्या सशक्ततेचा संदेश देत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आयोजित मतदान जनजागृती रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम शहरातील विविध भागांत राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आज दिव्यांग बांधवांच्या सहभागातून भव्य मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्या प्रमुख उपस्थितीत ही रॅली निगडी प्राधिकरण येथील 'अ' क्षेत्रीय कार्यालय येथून सुरू होऊन बिजली नगर, वाल्हेकर वाडी, चापेकर चौक, चिंचवड मार्गे प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पोहोचली. रॅलीदरम्यान नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यासाठी विविध घोषणा देण्यात आल्या.

सदर रॅलीचा समारोप चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे करण्यात आला. यावेळी मतदान जनजागृतीसाठी सादर केलेल्या फ्लॅश मॉबने सर्वांचे लक्ष वेधले. तसेच उपस्थितांना, 'आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू. तसेच प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू,' अशी मतदानाची शपथ देण्यात आली. या रॅलीमध्ये दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# निवडणुकीतील विजयाने हुरळून जाऊ नका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** निवडणुकीत मिळालेल्या विजयाने हुरळून जाऊ नका, लोकांनी तुम्हाला सेवा करण्यासाठी निवडून दिले आहे. चुकीचे काम केले तर तुमची आणि पक्षाची बदनामी होते. त्यामुळे चुकीच्या गोष्टींना अजिबात थारा देऊ नका, अशी सक्त ताकीद उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना दिली.

जांभूळ फाटा येथील शिवराज पॅलेसमध्ये लोणावळा, तळेगाव दाभाडे नगरपरिषद तसेच वडगाव मावळ नगरपंचायतीतील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या सन्मान व पक्षप्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार सुनील शेळके, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, ज्येष्ठ नेते बबनराव भेगडे, विठ्ठलराव शिंदे, गणेश ढोरे, शंकरराव शेळके, महिलाध्यक्षा सुवर्णा राऊत, साहेबराव कारके, काळूराम मालपोटे, सुरेश चौधरी, कृष्णाजी कारके, अशोक भेगडे, विलासराव काळोखे, अतुल वायकर आदी उपस्थित होते.उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, शहराच्या विकासासाठी पहिल्या १०० दिवसांचा कृतीआराखडा तयार करा. स्वच्छता, पिण्याचे पाणी, भुयारी गटारे व घनकचरा व्यवस्थापनावर भर द्यावा. पक्षभेद न करता सर्वसामान्य जनतेसाठी काम करावे. प्रामुख्याने पिण्याचे पाणी, भुयारी गटार आणि घनकचरा व्यवस्थापन याकडे लक्ष देण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमात नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला तसेच विविध नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी केले. सूत्रसंचालन राज खांडभोर यांनी तर आभार विठ्ठल शिंदे यांनी मानले.

# निवडणूक प्रचाराचे दरपत्रक आयोगाकडून सादर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महापालिकेच्या रणांगणात राज्य पातळीवरील वरिष्ठ नेते प्रचारात सक्रिय झाले आहेत. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, दोन्ही शिवसेना आदी पक्षांचे नेते विमानाने किंवा हेलिकॉप्टरने उमेदवारांच्या प्रचारासाठी येणार असल्याचे गृहीत धरून निवडणूक आयोगाने या हवाई सफरीचेही दरपत्रक जाहीर केले आहे. त्याचसोबत शाकाहारी, मांसाहारी भोजन, झेंडे, फलकापासून ते अगदी वाद्यांपर्यंतचे दर निश्चित केले आहेत. त्या दरानुसारच उमेदवार व राजकीय पक्षांना खर्च सादर करावा लागणार आहे.

हा सारा खर्च उमेदवारांवर विभागून टाकला जाणार आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. उमेदवारी अर्ज माघारीनंतर आता प्रचाराचे नियोजन जोमात सुरू आहे. राजकीय पक्षांनी स्टार प्रचारकांना मैदानात उतरविण्याची तयारी सुरू केली आहे. विजयाला हातभार लागावा म्हणून एखाद्या राष्ट्रीय किंवा राज्य पातळीवर नेत्यांची प्रचार सभा महत्त्वाची ठरू शकते, असा विचार केला जात आहे. एखाद्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ एखादा नेता अशा प्रकारच्या साधनांचा वापर करून आला तर त्याचा सर्व खर्च त्या पक्षावर टाकला जाणार आहे. निवडणूक काळात दिल्ली, मुंबईहून राजकीय नेते प्रचारात सहभागी होतील. त्यांच्यासाठी हेलिपॅडची व्यवस्था राजकीय पक्षांकडून करण्यात येते. प्रचारातील वाहने, मंडप, व्यासपीठ, टेबल, खुर्चा, हॅलोजन, जनरेटर, पंख्यापासून ते अगदी झेंडे. टोप्यांपर्यंतचे दर निश्चित केले आहेत. त्या दरानुसार उमेदवारांना खर्च सादर करावा लागणार आहे. राजकीय पक्षांकडून होणारा खर्च उमेदवारांवर विभागून टाकला जाणार आहे. खर्चाची मर्यादा १३ लाखांपर्यंत आहे.

# निवडणूक अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या द्वितीय प्रशिक्षणास सुरुवात

## विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक व शैक्षणिक सादरीकरणाने रंगला कार्यक्रम; देशभक्ती व विकसित भारताचा संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** मतमोजणी ही निवडणूक प्रक्रियेतील अत्यंत संवेदनशील व महत्त्वाची प्रक्रिया असून यामध्ये कोणतीही चूक होऊ नये, यासाठी प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने नियम, तांत्रिक बाबी व आपली जबाबदारी पूर्णपणे समजून घेत कामकाज करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी हनुमंत पाटील यांनी दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने १६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतमोजणी प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावरील द्वितीय टप्प्यातील प्रशिक्षणास सुरुवात झाली आहे. आज आकुर्डी प्राधिकरण येथील ग. दि माडगूळकर सभागृह येथे पार पडलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय २ मधील मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी हनुमंत पाटील यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतमोजणी प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले, त्यावेळी ते बोलत होते. निवडणूक निरीक्षक सरिता नरके यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या प्रशिक्षणादरम्यान समन्वय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता हरविंदरसिंह बन्सल, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रविंद्र कुलकर्णी, चंद्रकांत मुठाळ, राजाराम सरगर तसेच मुख्य प्रशिक्षक सतीश मेहेर, अविनाश वाळुंज, रामेश्वर पवार, नरेंद्र बंड यांच्यासह मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने प्रशिक्षणास उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी हनुमंत पाटील यांनी मतमोजणी प्रक्रियेतील पारदर्शकता, अचूकता व शिस्त यावर भर देत मार्गदर्शन केले. संगणकीय सादरीकरणाद्वारे प्रत्यक्ष मतदान व मतमोजणीच्या दिवशी करावयाच्या कार्यवाहीबाबत तांत्रिक व कायदेशीर मार्गदर्शन करण्यात आले.

# पीसीयू हे दूरदृष्टी व जागतिक उद्दिष्टे असलेले शिक्षण केंद्र

## डॉ. विजय भटकर यांचे गौरवोद्गार; पिंपरी चिंचवड विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पीसीयू म्हणजे दूरदृष्टी व जागतिक उद्दिष्टे असलेले २१ व्या शतकातील अत्याधुनिक शिक्षण केंद्र आहे, जागतिक दर्जाचे विद्यापीठ म्हणून ही संस्था वेगाने पुढे जात आहे, असे गौरवोद्गार परम महासंगणकाचे शिल्पकार डॉ. विजय भटकर यांनी पीसीयूच्या पहिल्या पदवी प्रदान सोहळ्यात काढले.

विद्यापीठाच्या ध्येयधोरणाचे आणि दीर्घकालीन शैक्षणिक दृष्टीचे भटकर यांनी विशेष कौतुक केले. शैक्षणिक विस्ताराच्या योजना तसेच प्रस्तावित केंद्रीय संशोधन सुविधा, संशोधन केंद्र या उपक्रमांचा उल्लेख करत, हे केंद्र विद्यार्थी, प्राध्यापक आणि उद्योग क्षेत्रासाठी आंतरशाखीय संशोधन, नवोन्मेष आणि व्यावहारिक समस्यांच्या निराकरणासाठी एक महत्त्वाचे सामायिक व्यासपीठ ठरेल, असा विश्वास डॉ. भटकर यांनी व्यक्त केला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ, पुणे येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठाचा पहिला दीक्षांत समारंभ शनिवारी विद्यापीठ कॅम्पसमध्ये संपन्न झाला.

पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील म्हणाले, जागतिक दर्जाचे उद्योग - संलग्न विद्यापीठ म्हणून विकसित होण्याचे पीसीयूचे उद्दिष्ट आहे.

वेगाने विकसित होणाऱ्या आधुनिक उद्योग व्यवसायासाठी ज्ञान आणि संशोधन वृत्ती असणारे कुशल मनुष्यबळ घडविण्याचे काम पीसीयू मधील उच्चशिक्षित प्राध्यापक वर्ग करीत आहे. शैक्षणिक संस्था आणि उद्योग या दोन्ही घटकांनी एकत्र पद्धतीने काम केल्यास आर्थिक आणि सामाजिक आव्हानांवर उपाय शोधण्यास मदत होईल. आता आम्ही केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार देशाच्या विकासात सहभागी होण्यास पूर्ण क्षमतेने सज्ज आहोत असे त्यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमाळकर, पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मताई भोसले सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, व्यवस्थापन समिती सदस्य अजिंक्य काळभोर, नरेंद्र लांडगे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, एसटीपी पुणेचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे, पीसीयू कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, पीसीयू व्यवस्थापन समिती सदस्य डॉ. पंडित भालचंद्र विद्यासागर, सचिन इटकर, डॉ. दिनेश अमळनेरकर, राजेश पाटील, सलीम शिकलगार, पदवी प्राप्त विद्यार्थी, प्राध्यापक वर्ग आदी उपस्थित होते. यावेळी निषाद देशमुख, प्रेरणा लक्ष्मण कदम, अस्मिता सर्जेराव पाटील, मयुरी रोहिदास गव्हाणे, संजय हिमदेवी ठाकरे या सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांसह सर्व पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# सोशल मिडियावर चर्चांना वेग राजकीय वातावरण तापले

## पोस्ट, रील्स, स्टेटसच्या माध्यमातून प्रचार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीची चाहूल लागताच सोशल मीडियावर राजकीय चर्चांना वेग आला आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, एक्स (ट्विटर), व्हॉट्सअॅप सारख्या प्लॅटफॉर्मवर विविध पोस्ट, व्हिडिओ आणि कमेंट्सच्या माध्यमातून समर्थक, कार्यकर्ते आणि मतदार आपापली मते नोंदवत आहेत.

विविध राजकीय पक्षांचे नेते, इच्छुक उमेदवार आणि त्यांचे समर्थक सातत्याने पोस्ट, रील्स, स्टेटस आणि लाईव्ह चर्चांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच रंगत आले असून त्याचा सर्वाधिक ठसा सोशल मीडियावर उमटताना दिसत आहे.

घराघरात मोबाइल पोहोचल्याने आणि तरुणाई सोशल मीडियावर सक्रिय असल्याने निवडणूक चर्चासाठी डिजिटल माध्यम मोठे व्यासपीठ ठरत आहे. उमेदवार आपले जाहीरनामे, केलेली विकासकामे, पूर्वीचा कार्यकाळ आणि भविष्यातील आश्वासने सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून मांडत आहेत. विरोधकांवर टीका, प्रतिउत्तरांची देवाणघेवाण आणि समर्थकांच्या प्रतिक्रिया यामुळे या पोस्ट मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. विशेषतः तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर कमेंट्स आणि शेअरच्या माध्यमातून या चर्चेत सहभागी होताना दिसत आहे.काही ठिकाणी अफवा, दिशाभूल करणारे संदेश आणि भडकावू मजकूरही फिरताना दिसत असल्याने निवडणूक विभाग आणि पोलीस प्रशासनाने सजग भूमिका घेतली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### वाढदिवसाच्या वादातून युवकाचे घर पेटवले

**शिक्रापूर :** निमोणे ता. शिरूर येथे वाढदिवसामध्ये झालेल्या वादाच्या कारणातून युवकाचे घर पेटवल्याची घटना घडली. शिरूर पोलीस स्टेशन येथे अक्षय संतोष वाळुंज याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निमोणे येथील निखिल काळे याचे शिंदोडी गावातील अक्षय वाळुज याच्या सोबत एका वाढदिवसाच्या कार्यक्रमांमध्ये भांडण झाले होते, त्यानंतर निखिल हा शेतातील घरामध्ये झोपलेला असताना रात्रीच्या सुमारास अक्षय वाळूंज याने भांडणाचा राग मनात धरून निखिल याच्या घरावर पेट्रोल ओतून पेटवून दिले.

### युवतीचे अपहरण करत अत्याचार करणारा अटक

**शिक्रापूर :** शिक्रापूर येथील अपहरण झालेल्या सोळा वर्षीय मुलीसह मुलीचे अपहरण करुन अत्याचार करणाऱ्या युवकाला अटक करत युवतीला आई वडिलांच्या ताब्यात देण्यात पोलिसांना यश आले. शुभम अरुण घोडके असे पोलिसांनी अहिल्यानगर मधून अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. येथील एका अल्पवयीन युवतीचे अपहरण केल्याबाबतचा गुन्हा शिक्रापूर पोलिसांत दाखल झाला होता.

### गॅस सिलिंडरने भरलेला ट्रक थेट दुकानात

**शिक्रापूर :** येथील चाकण शिक्रापूर रस्त्यावर मांढरेवस्ती येथे चाकणच्या बाजूने आलेला गॅस सिलिंडरने भरलेला ट्रक एका दुकानात शिरुन अपघात झाल्याची घटना घडली, सुदैवाने कोणतीही हानी झाली नाही. चाकण बाजूने गॅस सिलिंडरने भरलेला ट्रक शिक्रापूरच्या दिशेने येत असताना मांढरे वस्ती येथील दुभाजकावर समोरील वाहनाने ब्रेक दाबल्याने पाठीमागून आलेल्या या ट्रक चालकाने तो बाजूला घेतला. मात्र यावेळी शेजारीच असलेल्या एका दुकानात शिरला.

पारंपारिक वाद्याच्या गजरात व हजारो भाविकांच्या उपस्थितीत

# श्री खंडोबा म्हाळसाईचा शाही विवाह सोहळा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** धामणी (ता.आंबेगांव) येथील खंडोबा देवस्थान मंदिराच्या प्रांगणात पारंपारिक वाद्याच्या गजरात व हजारो भाविकांच्या उपस्थितीत शाही थाटात शनिवारी पौष पौर्णिमेनिमित्त सदानंदाचा येळकोट च्या जयघोषात खंडोबा म्हाळसाईचा विवाह सोहळा संपन्न झाला.

शनिवारी पहाटे माघस्नान समारंभ, कुलधर्म, अन्वाधान, पौष पौर्णिमेला खंडोबा मंदिरात स्वयंभू सप्तशिवलिंगाचा अभिषेक अकरा जोडप्यांच्या हस्ते रुद्राभिषेक व दुग्धाभिषेक करण्यात आला. नंतर भाविकांच्या उपस्थितीत आरती केली. त्यानंतर सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, शांताराम भगत, राजेश भगत, नामदेव भगत, पांडुरंग भगत, प्रमोद देखणे, धोंडीबा भगत, अनिरुध्द वाळूंज, बाळशिराम साळगट, दिनेश जाधव, सुरेश पवार, माऊली वाघे,




सिताराम वाघे यांनी व महिला भाविकांनी स्वयंभू सप्तशिवलिंगाला व सर्वांगसुंदर खंडोबा व म्हाळसाईच्या पंचधातूच्या लोभसवाण्या मुखवट्यांना चंदनऊटीचा लेप दिला व त्यावर सुंगधी दवणाच्या अत्तरात मिश्रित केलेली पिवळीधम्मक हळद लावण्यात आली.

सकाळी नऊ वाजता बाळासाहेब महादू बढेकर,विठ्ठल बढेकर,अंकुश बढेकर,अक्षय तोत्रे (चांडोली) संतोष भुमकर यांच्या मानाच्या मांडव डहाळ्याची पारंपारिक वाद्याच्या व डीजेच्या गजरात धामणीच्या पेठेतून मिरवणूक काढण्यात येऊन सजवलेल्या बैलगाड्यातील मांडव डहाळे मंदिरात सदानंदाचा येळकोट करुन व भंडाऱ्याची उधळण करुन देवाला अर्पण करण्यात आले. श्री म्हाळसाकांत खंडोबा व म्हाळसादेवी यांच्या लग्न सोहळ्यानिमित्त मंदिराच्या गाभाऱ्यात आकर्षक फुलांची सजावट केलेली होती. खंडोबाला व म्हाळसाईच्या देखण्या मूर्तीना बाशिंग व मुंडावळ्या बांधण्यात आल्या. गावातील मुक्ताबाई मंदिरात पौष महिण्याच्या खंडोबाच्या पालखीचे परंपरागत मानकरी समस्त करंजखेले मळ्यातील मंडळीच्या हस्ते तळीभंडार व आरती करण्यात आली. त्यानंतर आकर्षक वस्रालंकाराने सजवलेल्या व बाशिंग व मुंडावळ्या बांधलेल्या खंडोबाचा मुखवटा पालखीत ठेवून पारंपारिक वाद्याच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. पालखीसमोर पिंपळवंडी(जुन्नर) येथील आकर्षक अश्व(घोडा) सर्वांचे लक्ष वेधून घेताना दिसला. पालखीची मिरवणूक सायंकाळी पावणेपांच वाजता मंदिरात विसावली. मंदिराच्या आवारात नवरदेव म्हाळसाकांत खंडोबाच्या मुखवट्याचे महिलांनी औक्षण करुन स्वागत केले. त्यानंतर सनई व तुतारीच्या निनादात बाशिंग व मुंडावळ्या घातलेल्या व हिरवी साडी परिधान केलेल्या व वस्रालंकार घातलेला म्हाळसाईचा मुखवटा मंदिरातून सेवेकरी मंडळीनी लग्नमंडपात वाजतगाजत आणला. सायंकाळी पांच वाजता मंगलाष्टकाला सुरुवात करण्यात येऊन खंडोबा व म्हाळसाईच्या मुखवट्यावर फुलांच्या पाकळ्याची व अक्षता व भंडाऱ्याची उधळुन वाद्याच्या गजरात व फटाक्याच्या आतषबाजीत सदानंदाचा येळकोट चा जयघोष करुन खंडोबा व म्हाळसाईचा विवाह सोहळा पार पडला. त्यानंतर उपस्थित वऱ्हाडी मंडळीनी बुंदी, भात, आमटी या महाप्रसादाचा आस्वाद घेतला. शाही विवाह सोहळ्याचे पौरोहित्य प्रमोद देखणे, बाळासाहेब बेरी व मुकुंद क्षिरसागर यांनी केले. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष प्रकाश जाधव, प्रभारी सरपंच अक्षय विधाटे, सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, नामदेव भगत, माजी सरपंच सागर जाधव, पहाडदऱ्याचे सरपंच मच्छिंद्र वाघ, शामराव करंजखेले, माजी सरपंच रेश्मा बोऱ्हाडे, उपसरपंच संतोष करंजखेले, भाऊसाहेब करंडे, अशोक करंजखेले, अरुण करंजखेले, भाऊसाहेब कदम, उत्तम जाधव, निलेश करंजखेले, दगडूभाऊ करंजखेले, भगवान वाघ, भगवान बढेकर, लोणीचे माजी सरपंच दिलीप वाळुंज, अशोकराव कांदळकर (कवठे यमाई) यांच्यासह सेवेकरी, मानकरी मंडळी व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते महिला भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती.

## मधमाश्यांच्या हल्ल्यात ३५ गिर्यारोहक जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** केळद (ता. राजगड) येथील रायगडच्या हद्दीवरील अतिदुर्गम मढे घाट परिसरात गिर्यारोहणासाठी आलेल्या पुण्यातील मुलांवर मधमाश्यांनी तुफान हल्ला केला. त्यात संयोजकासह ३५ जण जखमी झाले आहेत. तर सहा जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. हा प्रकार रविवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास घडला.

पुण्यातील गिरीप्रेमी संस्थेच्या वतीने विविध शाळांतील दहा ते पंधरा वयोगटातील मुला-मुलींच्या गिर्यारोहण सहलीचे आयोजन करण्यात आले होते. एका बसने सर्वजण मढे घाट परिसरात रविवारी सकाळी आले होते. त्यावेळी त्यांच्यावर एकाच वेळी भल्या मोठ्या पोळ्याच्या मधमाश्यांनी तुफान हल्ला केला. त्यामुळे ही मुले आडमार्गाच्या खडकाळ अरुंद पायी मार्गाने सैरावैर धावत होती. दाट धुक्यामुळे मुलांना मार्गही सापडत नव्हता. मधमाश्यांच्या दंशामुळे मुलांना मळमळ, उलटी होणे, चक्कर येणे आदी त्रास झाला. अनेकांचे चेहरे सुजले होते. तीव वेदना होत होत्या.

घटनेची माहिती मिळताच वेल्हे, धायरी व खेड शिवापूर येथील १०८ क्रमांकाच्या सरकारी रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल बोरसे व इतर डॉक्टरांनी तातडीने जखमी मुलांवर उपचार सुरू केले. तेथून जखमींना वेल्हे येथील सरकारी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. ६ जणांची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. ज्ञानेश्वर हिरास यांनी पुण्यातील रुग्णालयात पाठवले आहे.

## ढगाळ हवामानाचा गहू-कांदा पिकाला फटका शेतकऱ्यांकडून पिकांवर औषध फवारणी सुरू



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात शनिवार (दि.३) पासून ढगाळ हवामानाचे सावट निर्माण झाले आहे. याचा गहू व कांदा या प्रमुख रब्बी पिकांना मोठा फटका बसला आहे. सूर्यप्रकाशाच्या अभावामुळे पिकांची वाढ खुंटण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.रोगराईचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी औषध फवारणीला सुरुवात केली आहे. दूषित हवामानामुळे गहू पिकावर करपा, तांबेरा तसेच पानांवरील डाग यांसारख्या रोगांचा धोका वाढला आहे. तर कांदा पिकावर करपा, थ्रिप्स तसेच बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी प्रतिबंधात्मक औषधांची फवारणी सुरू केली आहे. वाढलेला उत्पादन खर्च, औषधांचे दर आणि मजुरी यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक ताणही वाढला आहे. या परिसरात पिकांची पाने पिवळी पडणे, कांद्याची वाढ मंदावणे अशी लक्षणे दिसून येत असल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे.

## राजगुरुनगरात भरदिवसा घरफोडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**खेड :** राजगुरुनगर शहरातील होलेवाडीत शनिवारी भरदिवसा घरफोडी करून चोरट्यांनी दागिने, रोकड आणि अन्य साहित्य असा एकूण ६८ लाख २ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी मोतीलाल कांतिलाल गदिया (वय ५९, रा. श्री अपार्टमेंट, पाबळ रस्ता, होलेवाडी, राजगुरुनगर) यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदवली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी गदिया हे व्यावसायिक आहेत. शुक्रवारी रात्री संपूर्ण गदिया कुटुंब घर बंद करून सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी गेले होते. शनिवारी दुपारी दीड वाजता शेजारी राहणाऱ्या महिलेने मोतीलाल गदिया यांना मोबाईलवरून संपर्क साधून घराच्या तीन दरवाजांची कुलपे तुटलेली असल्याचे सांगितले. त्यानंतर मोतीलाल यांच्या जवळच राहात असलेल्या बहिणीने घराची पाहणी केली असता कपाटे उघडी आणि सामान अस्ताव्यस्त पडलेले आढळले. त्यानंतर गदिया कुटुंब रात्री साडेनऊ वाजता घरी परतले असता चोरीची खात्री झाली. चोरट्यांनी घरातील कपाटे तोडून सोन्याचे हार, मंगळसूत्र, बांगड्या, चेन, बेसलेट, अंगठ्या, पेंडंट, चांदीची भांडी, घड्याळे आणि १० लाखांची रोकड चोरून नेल्याचे समोर आले.

चोरीचा एकूण ऐवज अंदाजे ६८ लाख २ हजार रुपयांचा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. गदिया यांच्या इमारतीभोवती असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. त्यात दोन चोरटे रिकामे येऊन जाताना बॅग घेऊन जाताना दिसून येत असल्याचे पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण यांनी सांगितले.

## समाजापुढे आदर्श ठेवणाराच खरा शिक्षक



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** जो समाजापुढे आदर्श ठेवतो तोच खरा आदर्श शिक्षक असतो. गोरगरीब मुलांना शिक्षणासाठी आधार देणा-या गुरूजनांचे कार्य कौतुकास्पद आहे. अशा सामाजिक योगदान देणा-या भिमाशंकर गुरूकुल प्रतिष्ठानच्या सामाजिक उपक्रमाला माझे नेहमीच सहकार्य राहील तसेच " गुरूवर्य " शैक्षणिक दिनदर्शिका शिक्षकांसाठी मार्गदर्षक राहणार असल्याचे सहायक पोलीस निरीक्षक सागर पवार यांनी सांगितले.

भिमाशंकर गुरूकुल प्रतिष्ठानच्या गुरूवर्य या शैक्षणिक दिनदर्शिकेचे प्रकाशन ह. भ. प. पांडूरंग महाराज येवले व घोडेगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सागर पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी पवार बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शारदा प्रबोधिनीचे संस्थापक अध्यक्ष पांडूरंग महाराज येवले होते. यावेळी अॅड. संजय आर्विकर, राष्ट्रीय शिक्षक महासंघाचे नेते बाळासाहेब झावरे, राष्ट्रीय अध्यक्ष आबासाहेब जगताप, उदयोगपती सुनिल गावडे, पुणे जिल्हा परिषद शिक्षण समितीचे माजी सदस्य दत्तात्रय वाळुंज, शंकरशेठ शहा, दिलीप ढमढेरे, भरत फदाले, रुपाली धोका आदि मान्यवर उपस्थित होते.

भिमाशंकर गुरूकुल प्रतिष्ठानने मागील आठ वर्षापासून आंबेगाव तालुक्यातील अनाथ, निराधार, दिव्यांग, गरजू मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमासाठी उदयोगपती सुनिलशेठ गावडे यांनी शैक्षणिक साहित्य वाटपासाठी एक लाख रूपयांची देणगी यावेळी जाहीर केली.

दत्तात्रय वाळुंज, नारायण काळे, आनंद संत, नंदकुमार येवले, सुनिल पाटील, सुरेंद्र डोके, मच्छिंद्र झांजरे, सुनिल बुरसे, किसान शिंगाडे, ईश्वर फदाले, किसन कोंढवळे, प्रदिप चासकर या शिक्षकांनी भिमाशंकर गुरूकुल प्रतिश्ठानच्या माध्यमातून गुरूवर्य ही शैक्षणिक दिनदर्शिका प्रकाशित केली आहे. या दिनदर्शिकेत शिक्षकांना विविध प्रस्तावासाठी लागणारी कागदपत्रे, विदयार्थी लाभाच्या योजना, शिष्यवृत्ती योजना, शासन निर्णय परिपत्रके, राष्ट्रपुरूषांची माहिती, विविध शैक्षणिक माहितीचा अंतर्भाव या दिनदर्शिकेत असून राज्यातील शिक्षकांना ही दिनदर्शिका उपयुक्त ठरणार असून दिनदर्शिकेचे मोफत वितरण करण्यात येणार असल्याचे गुरूकुल प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती नगदवाडीत उत्साहात साजरी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** नगदवाडी ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, अशी माहिती केंद्रशाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थीनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाईंची वेशभूषा परिधान करून त्यांच्या जीवनावर आधारित मनोगत व्यक्त केले. शाळेतील विद्यार्थिनी मैत्री कुतळ, जोया अन्सारी,अन्वी बढे, तेजस्विनी बढे, मिनाक्षी चव्हाण, प्रणवी शिंदे, महेश्वरी बढे, रंजना चव्हाण, सायली शिंदे, सार्विका कोकणे, ऋत्विका बढे, सानवी बढे, सानवी चव्हाण, भूमी बढे, आरोही त्रिभुवन, आराध्या बढे, स्वरा बढे, आराध्या राठोड, तेजवी कोरडे, मैत्री टेके, परी टेके, हार्दिक जोगराणा व मेहुल जोगराणा या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

मनोगत व्यक्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवनीत इंग्रजी पॉकेट डिक्शनरी भेट देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे नियोजन केंद्रशाळेतील शिक्षक मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ,सुप्रिया अभंग,आशा आरेकर व उज्वला कांबळे यांनी केले. बालिका दिनानिमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

## थापलिंग देवस्थान विकासासाठी ५० लाखांचा निधी देणार : दिलीप वळसे पाटील

### एमएसआयडीसी लवकरच कामाला सुरुवात करणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** श्री क्षेत्र थापलिंग देवस्थान विकासासाठी या पूर्वकाळात मी आमदार निधी, तीर्थक्षेत्र विकास निधी उपलब्ध करून दिला. त्यातून थापलिंग गडावर विविध विकास कामे झाली. थापलिंग देवस्थान विकासासाठी जाहीर केल्याप्रमाणे भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या भागविकास निधीतून ५० लाख रुपयांचा निधी थापलिंग देवस्थान ट्रस्टकडे वर्ग केला आहे. पुढच्या यात्रेपर्यंत आणखी ५० लाख रुपयांचा निधी मी राज्यशासन, इतर निधीतून उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही माजी मंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी रविवारी (दि.४) दिली.

नागापूर (ता.आंबेगाव) येथील श्री.क्षेत्र थापलिंग गडावर खंडोबा देवाच्या यात्रेनिमित्त आमदार दिलीप वळसे पाटील यांनी खंडोबा देवाचे दर्शन घेऊन तळीभंडार केला.



त्यानंतर बैलगाडा घाटात गेल्यावर यात्रेकरूंना शुभेच्छा देताना वळसे पाटील बोलत होते.

दिलीप वळसे पाटील म्हणाले, मी भाग्यवान आहे. लहानपणापासून थापलिंग यात्रेला मला येण्याची संधी मिळाली. गेल्या वर्षी यात्रेत थापलिंग देवस्थान विकास कामांसाठी भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या भागविकास निधीतून ५० लाख रुपये देण्याचे आश्वासन पूर्ण केले आहे. भीमाशंकर कारखान्याने थापलींग देवस्थान ट्रस्टकडे हा निधी वर्ग केला आहे. थापलिंग गडावर आणखी विकास कामांसाठी मोठ्या निधीची गरज आहे. पुढच्या यात्रेपर्यंत आपण राज्य शासनाच्या माध्यमातून आणखी ५० लाखांचा निधी उपलब्ध करून देणार आहोत. याशिवाय थापलिंग देवस्थानासाठी जेव्हा जेव्हा जी मदत लागेल. ती मदत प्राधान्याने केली जाईल, असे त्यांनी सांगितले. देवस्थान ट्रस्टच्या वतीने वळसे पाटील यांचा सत्कार देवस्थान ट्रस्टचे सचिव डी. एन. पवार यांच्या हस्ते करण्यात आला. भीमाशंकर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, सचिन भोर, माजी जिल्हा परिषद सदस्य तुलसी भोर, पंचायत समितीच्या माजी सभापती उषा कानडे, अंकिता वाळुंज, सुनंदा ढोबळे आदी उपस्थित होते.

## जुन्नर तालुक्यात रब्बी हंगाम संकटात सापडला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** गेल्या तीन-चार दिवसांपासून जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागात असलेल्या ढगाळ वातावरणामुळे रब्बी हंगाम संकटात सापडला आहे. ढगाळ वातावरण आणि धुक्याच्या प्रादुर्भावामुळे कांदा, गहू, हरभरा यांसह अन्य पिकांवर किडीचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता निर्माण झाली असून शेतकरी पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे. सततच्या हवामान बदलाचा मोठा परिणाम पिकांच्या वाढीवर होत आहे.

सकाळी आणि रात्री उशिरापर्यंत असलेल्या ढगाळ हवामानामुळे कांद्यावर करपा, तर हरभऱ्यावर घाटे



अळीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामातील गहू, तूर, वाटाणा, मका व हरभरा पिकांवर विविध किडींनी हल्लाबोल केल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या किडींच्या बंदोबस्तासाठी शेतकऱ्यांवर पुन्हा एकदा महागड्या कीटकनाशक फवारणीची वेळ आली आहे. कृषी विभागाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शेतकऱ्यांनी वेळीच पिकांची काळजी घेऊन फवारणी करावी, असे आवाहन केले आहे.

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन

## बालिका दिनानिमित्त चिल्हेवाडी शाळेत भरला बालआनंद मेळावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बनकरफाटा :** भारतातील पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी व समस्त स्रियांना ज्ञान उजेडाची वाट दाखवणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले ज्यांनी स्त्रियां बद्दल "चुल आणि मुल" ही भावना मोडीत काढुन स्त्रीशिक्षणाचा पाया रोवला. अशा या थोर मातेच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच अनुसया भोईर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीमाई



फुले यांच्या जीवन कार्याविषयीची माहिती प्रास्ताविकामध्ये मुख्याध्यापक प्रभाकर दिघे यांनी दिली. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंची गीते सादर केली.

सावित्रीमाई यांची वेशभूषा इयत्ता चौथीतील कुमारी जान्हवी भोईर या बालिकेने केली होती. आज महिला सर्वच क्षेत्रांमध्ये अग्रेसर असल्या तरी या मागची प्रेरणा क्रांतीज्योती सावित्रीमाईची आहे सावित्रीबाईंनी शिक्षणाची दारे खुली केली म्हणून आज महिला ताठ मानेने समाजामध्ये वावरताना दिसत आहेत. मुलींनी शिकले पाहिजे मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण अशा भावना सरपंच अनुसया भोईर यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केल्या. याप्रसंगी पिंपळगाव जोगा केंद्रप्रमुख संजय जाधव यांनी स्त्रियांच्या गौरवशाली कर्तुत्वाचा आलेख उंचावत असताना सावित्रीमाईचा वसा जपला पाहिजे. असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले. उपसरपंच नितीन भोईर यांनी सर्वांना बालिका दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आपली पिढी संस्कारक्षम झाली पाहिजे असे मत शिवाजी भोईर यांनी व्यक्त केले. मुख्याध्यापक प्रभाकर दिघे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. बालिका दिनाच्या निमित्ताने बालआनंद मेळावा अंतर्गत भाजी बाजार हा उपक्रम घेण्यात आला. सर्वच मुले शेतकरी कुटुंबातून येत असल्याने घरगुती भाजीपाला मुलांनी विक्रीसाठीआणला होता. यामध्ये कांद्याची पात, मेथीची भाजी, अळूची पाने, वालवड, घेवडा, बीट, हरभऱ्याची भाजी, कोथिबीर, इडली डोसा, भेळ, ओली भेळ, चहा, कांदापोहे आदी स्टॉल विद्यार्थ्यांनी लावले होते.

चिल्हेवाडी सारख्या छोट्याशा गावामध्ये प्रथमच भाजी बाजार भरल्याने पालकांमध्ये, ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. १६०० रुपयाची उलाढाल ह्या भाजी बाजारातून करण्यात आली.

## सारांश वृत्त

### जमशेदपूरमध्ये शस्त्रास्त्रांसह अटक

**जमशेदपूर :** जमशेदपूरमध्ये एका खुनाच्या आरोपीसह तीन जणांना शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्यासह अटक करण्यात आली, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. एका गुप्त माहितीच्या आधारे, वरिष्ठ पोलिस अधीक्षक (पूर्व सिंहभूम) पियुष पांडे यांनी आवश्यक कारवाई करण्यासाठी पोलिस उपअधीक्षक (मुख्यालय-१) भोला प्रसाद सिंह यांच्या नेतृत्वाखाली एक पोलिस पथक तयार केले. येथे पत्रकार परिषदेत बोलताना पांडे म्हणाले की, पथकाने जलदगतीने कारवाई केली आणि संशयावरून एका किशोरवयीन हत्येच्या आरोपीसह काही लोकांना अटक केली.

### कन्नौज तुरुंगातून दोन कैदी पळाले

**कन्नौज (उत्तरप्रदेश) :** कन्नौज जिल्हा मुख्यालयापासून सुमारे २५ किमी अंतरावर असलेल्या अनौगी येथील जिल्हा कारागृहातून रविवारी रात्री दोन अंडरट्रायल कैदी तुरुंगाची भिंत ओलांडून पळून गेले, असे पोलिसांनी सांगितले. सोमवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास नियमित मोजणी सुरू असताना दोन कैदी बेपत्ता असल्याचे आढळून आल्याने पळून जाण्याचा प्रकार उघडकीस आला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पोलिस अधीक्षक (एसपी) विनोद कुमार म्हणाले की, कैद्यांनी ब्लँकेटचा वापर करून दोरी बनवली आणि पळून जाण्यासाठी तुरुंगाची भिंत ओलांडली.

### त्रिपुरात युवक काँग्रेस नेत्याला अटक

**आगरतळा :** दोन एफआयआर प्रकरणी अटक टाळण्यासाठी गेल्या सहा महिन्यांपासून फरार असलेले त्रिपुरा प्रदेश युवक काँग्रेस (टीपीवायसी) नेते शाहजान इस्लाम यांना सोमवारी पोलिसांनी अटक केली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. ८ जून २०२५ रोजी फेसबुकवर लाईव्ह प्रसारणादरम्यान मुख्यमंत्री माणिक साहा यांच्याविरुद्ध अपमानास्पद टिप्पणी केल्याबद्दल आणि भाजप कार्यकर्त्यांवर झालेल्या कथित हल्ल्याबद्दल शाहजान यांच्याविरुद्ध भाजपचे माजी राज्य समितीचे कोषाध्यक्ष नागाधिराज दत्ता यांनी एफआयआर दाखल केला होता.

## रशियाकडून तेल खरेदी न थांबवल्यास आणखी कर

# अमेरिकेने भारताला पुन्हा धमकावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताकडून रशियन तेल खरेदी करण्याबाबत एक महत्त्वाचा दावा केला आहे. त्यांनी म्हटले आहे की भारत त्यांना शांत करण्याचा प्रयत्न करत आहे. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एक चांगले व्यक्ती असल्याचेही सांगितले. अमेरिकेने रशियन तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर ५० टक्के कर लादला आहे. सुरुवातीच्या २५ टक्के कर आकारणीसोबतच अमेरिकेने भारतावर दंडही लादला आहे. रशियाच्या तेलावरून अमेरिका आणि युरोपियन युनियनकडून भारताला लक्ष्य केले जात असल्याचे भारताने स्पष्ट केले आहे.

रविवारी एअर फोर्स वनमध्ये पत्रकारांशी बोलताना ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदीचा मुद्दा उपस्थित केला. भारताबद्दल ते म्हणाले, "...ते मला खूश करायचे होते.... पंतप्रधान मोदी खूप चांगले व्यक्ती आहेत. ते खूप चांगले व्यक्ती आहेत. त्यांना माहित होते की मी आनंदी नाही. मला आनंदी ठेवणे महत्वाचे आहे. ते व्यवसाय करतात आणि आम्ही खूप लवकर शुल्क वाढवू शकतो..."

डिसेंबरमध्ये ट्रम्प यांनी लादलेले ५० टक्के कर रद्द करण्यासाठी तीन प्रभावशाली अमेरिकन कायदेकर्त्यांनी ठराव मांडला. त्यात दक्षिण कॅरोलिनाचे डेबोरा रॉस, टेक्सासचे प्रतिनिधी मार्क व्हेसी आणि इलिनॉयचे प्रतिनिधी राजा कृष्णमूर्ती यांचा समावेश होता. त्यांनी असा युक्तिवाद केला की बेजबाबदार शुल्क धोरणाचे गंभीर परिणाम होतील आणि एक महत्त्वाची भागीदारी कमकुवत होईल.

२०२५ या वर्षाची सुरुवात अमेरिका-भारत संबंधांसाठी सकारात्मक पद्धतीने झाली. पंतप्रधान मोदी फेब्रुवारीमध्ये वॉशिंग्टनला गेले आणि त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प यांच्याशी पहिली द्विपक्षीय बैठक घेतली. एका महिन्यापूर्वी, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी २१ जानेवारी रोजी ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यात अमेरिकन कॅपिटलमध्ये पुढच्या रांगेत बसून भारत सरकारचे प्रतिनिधित्व केले आणि काही तासांनंतर, नवीन परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी जयशंकर यांच्यासह क्वाड सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक आयोजित केली. परंतु जसजसे महिने उलटत गेले तसतसे द्विपक्षीय संबंध, जे पूर्ण वेगाने पुढे जात होते, त्यांना शुल्क आणि व्यापारावरील मतभेदांच्या स्वरूपात अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. ट्रम्प यांनी काँग्रेसच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करताना, अमेरिकन उत्पादनांवर उच्च शुल्क लादल्याबद्दल भारत आणि इतर देशांवर टीका केली. ट्रम्प यांनी भारताला "उच्च शुल्क आकारणारा देश" म्हटले आणि त्यांचे व्यापार सल्लागार पीटर नवारो यांनी भारताला "शुल्कांचा राजा" म्हटले.

ट्रम्प यांनी भारताकडून रशियन तेल खरेदी केल्याबद्दल टीका केली आहे आणि ऑगस्टमध्ये त्यांनी भारतीय आयातीवर अतिरिक्त २५ टक्के कर लादला, ज्यामुळे भारतावरील एकूण कर ५० टक्क्यांपर्यंत वाढला. अमेरिकन कायदेकर्त्यांनी ट्रम्पच्या भारतावरील करांवर टीका केली आहे.

ट्रम्प प्रशासनाने कायदेशीर आणि बेकायदेशीर स्थलांतरावर कारवाई वाढवली आहे आणि एच-१बी सारख्या व्हिसावर नवीन आणि कडक निर्बंध लादले आहेत.

## हाऊडी मोदीचा फायदा झाला नाही; काँग्रेसची टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर लवकरच अतिरिक्त शुल्क लावण्याचा इशारा दिल्यानंतर काँग्रेसने सोमवारी केंद्र सरकारवर तीव्र टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ट्रम्प यांच्यातील वैयक्तिक मैत्री, नमस्ते ट्रम्प आणि हाऊडी मोदी यांसारखे भव्य कार्यक्रम आणि अमेरिकन राष्ट्राध्यक्षांची स्तुती करणाऱ्या सोशल मीडिया पोस्ट्स यांचा भारताला कोणताही ठोस फायदा झाला नाही, असा आरोप काँग्रेसने केला.

काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी आपल्या अधिकृत सोशल मिडिया अकाउंटवरुन पोस्ट करताना पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीका केली. आपल्या पोस्टमध्ये, पंतप्रधानांचे व्हाईट हाऊसमधील चांगले मित्र भारताबाबत कधी अनुकूल तर कधी प्रतिकूल भूमिका घेत आहेत. भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवले नाही, तर अमेरिकेत होणाऱ्या भारतीय आयातीवर अधिक शुल्क लावले जाईल, असा इशारा पुन्हा देण्यात आला आला आहे. सर्व भव्य कार्यक्रम आणि जाहीर कौतुक असूनही, ट्रम्प प्रशासन भारतावर दबाव आणतच आहे. या सर्व मैत्रीचा प्रत्यक्ष धोरणात्मक लाभ दिसत नाही, असा टोला त्यांनी लगावला.

रविवारी फ्लोरिडाहून वॉशिंग्टन डीसीला जात असताना ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितले की, भारताला खूश करायचे होते, मात्र अमेरिकेला भारताच्या रशियन तेल खरेदीबाबत नाराजी आहे, त्यामुळे अमेरिका लवकरच शुल्क वाढवू शकते. त्यांच्या या वक्तव्यावरून भारताच्या परराष्ट्र आणि व्यापार धोरणावर काँग्रेसने प्रश्न उपस्थित केले आहेत. अमेरिकन सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी रशियन तेल खरेदी करणाऱ्या देशांवर कठोर शुल्क लावण्याची मागणी केली असून, यामध्ये भारताचाही समावेश होतो. त्यामुळेच केंद्र सरकारच्या परराष्ट्र धोरणाच्या प्रभावावर विरोधकांनी आक्रमक धोरण अवलंबले आहे.

## आसामला भूकंपाचे धक्के; सुदैवाने हानी नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**गुवाहाटी :** आसाममधून एक मोठी बातमी समोर आली आहे. आसामच्या मोरीगाव जिल्ह्यात आज पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.१ इतकी नोंदवण्यात आली असून, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती नाही. मात्र अचानक बसलेल्या हादऱ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून अनेकांची झोपेतूनच धावपळ उडाली.

राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राच्या माहितीनुसार, भूकंपाचे केंद्र २६.३७ अंश उत्तर अक्षांश आणि ९२.२९ अंश पूर्व रेखांशावर होते. हा भूकंप जमिनीखाली सुमारे ५० किलोमीटर खोलीवर झाला. पहाटेच्या शांततेत जोरदार धक्का बसल्याने अनेक नागरिक घाबरून घराबाहेर पडले आहेत.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपामुळे कोणत्याही प्रकारचे जीवित किंवा मोठ्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचे तात्काळ वृत्त नाही. मात्र मध्य आसामच्या काही भागांमध्ये सौम्य ते मध्यम स्वरूपाचे हादरे नागरिकांना जाणवले. भूकंपाच्या वेळी अनेक नागरिक झोपेत असल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, आसामसह मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि ईशान्य भारतातील इतर काही भागांमध्येही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले असल्याची माहिती आहे. मात्र हे हादरे तीव्र नसल्याने फारसा धोका निर्माण झाला नाही. प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवले असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## उमर खालिद आणि शरजीलला दिलासा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्ली येथे २०२० साली झालेल्या दंगलीत कट रचल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी विद्यार्थी कार्यकर्ते उमर खालिद आणि शरजील इमाम यांचा जामीन नाकारला. न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. या दोघांचा जामीन नाकारत असताना गुल्फिशा फातिमा, मीरान हैदर, शिफा उर रहमान, मोहम्मद सलीम खान आणि शादाब अहमद या पाच आरोपींना मात्र जामीन दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने उमर खालीद आणि शरजील इमाम या दोघांना मुख्य आरोपी म्हणून अधोरेखित करत असताना कथित दहशतवादी कृत्याची संकल्पना, नियोजन आणि समन्वय साधण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती, असे निरीक्षण नोंदविले. या दंगलींमध्ये ५० हून अधिक लोक मारले गेले आणि ७०० हून अधिक जखमी झाले.

आरोपी आणि दिल्ली पोलिसांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने १० डिसेंबर रोजी आपला निर्णय राखून ठेवला होता. २०२० च्या दिल्ली दंगलीतील कथित भूमिकेसाठी हे सर्व आरोपी पाच वर्षांहून अधिक काळ तुरुंगात आहेत. उमर खालिद आणि शरजील इमाम वगळता, इतर आरोपींना जामीन मिळाल्यानंतर तुरुंगातून सोडण्यात येईल.

बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या गुन्ह्यात जामीन नाकारण्याच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला त्यांनी आव्हान दिले होते. हा खटला २०२० च्या दंगलींमागील कथित "मोठ्या कटाशी" संबंधित आहे. नागरिकत्व (दुरुस्ती) कायदा (सीएए) आणि प्रस्तावित राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) विरोधात झालेल्या निदर्शनांमध्ये हे दंगली उसळल्या, ज्यामुळे ५३ लोकांचा मृत्यू झाला आणि ७०० हून अधिक लोक जखमी झाले. २०२० च्या दिल्ली दंगली भडकवण्याचा कट रचल्याच्या आरोपाखाली उमर खालिद, शरजील इमाम, गुलफिशा फातिमा, मीरान हैदर, शिफा उर्फ रहमान, शाहदाब अहमद आणि मोहम्मद सलीम हे पाच वर्षांहून अधिक काळ तुरुंगात आहेत. १० डिसेंबर २०२५ रोजी युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने जामिनावर निर्णय राखून ठेवला. दिल्ली उच्च न्यायालय आणि कनिष्ठ न्यायालयाने त्यांना जामीन नाकारला आहे. २ सप्टेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने जामीन नाकारला, ज्यामुळे आरोपींना सर्वोच्च न्यायालयात जावे लागले.

## इराणचे अयातुल्ला खामेनी देश सोडणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इराणमध्ये निदर्शने वाढत असताना आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हस्तक्षेप करण्याची धमकी दिल्याने अनेक निदर्शकांचा मृत्यू झाला असताना, आता एका अहवालात एक महत्त्वाचा दावा करण्यात आला आहे. माध्यमातील एका अहवालात असा दावा करण्यात आला आहे की आर्थिक संकटाविरुद्धच्या व्यापक निदर्शनांमध्ये इराणचे अयातुल्ला अली खामेनी देश सोडून पळून जाण्याचा विचार करत आहेत. अहवालात म्हटले आहे की खामेनीकडे एक बॅकअप प्लॅन आहे.

गुप्तचर अहवालांचा हवाला देत या अहवालात म्हटले आहे की, खामेनी त्यांच्या २० जवळच्या सहकाऱ्यांसह आणि कुटुंबासह इराणमधून पळून जाण्याचा विचार करत आहेत. त्यात असा दावा करण्यात आला आहे की, सीरियातील बशर अल-असद यांच्याप्रमाणे खामेनी रशियामध्ये आश्रय घेऊ शकतात. कारण असे दिले आहे की, खामेनींना मॉस्कोला पळून जावे लागेल कारण त्यांच्यासाठी दुसरी कोणतीही जागा नाही.

यापूर्वी, इराणच्या ढासळत्या अर्थव्यवस्थेमुळे झालेल्या निदर्शनांमध्ये झालेल्या हिंसाचारात किमान १५ जणांचा मृत्यू झाला होता. अहवालानुसार इराणच्या ३१ पैकी २५ प्रांतांमध्ये १७० हून अधिक ठिकाणी निदर्शने झाली आहेत. मृतांचा आकडा किमान १५ वर पोहोचला आहे आणि ५८० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे.

निदर्शनांमध्ये हिंसाचारात १५ जणांचा मृत्यू झाला होता. खामेनी यांनी दंगलखोरांना इशाराही दिला. इराणचे सर्वोच्च नेते देशात अशांतता निर्माण करणाऱ्या निदर्शनांबद्दल म्हणाले की, दंगलखोरांशी कठोरपणे वागले पाहिजे. निदर्शनांदरम्यान झालेल्या हिंसाचाराबद्दल ८६ वर्षीय अयातुल्ला अली खामेनी यांनी केलेली ही पहिलीच टिप्पणी आहे.

## सिंधू करार स्थगित केल्यामुळे तीव्रता वाढली

# पाकिस्तानातील पाणी संकटात वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** भारताने अलिकडच्या काळात दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेत पाकिस्तानला दोन मोठे धक्के दिले आहेत. ऑपरेशन सिंदूरने दहशतवाद्यांच्या अड्डयांवर लक्ष केंद्रित केले, तर सिंधू पाणी करार स्थगित करण्यात आला. तेव्हापासून पाकिस्तानमध्ये पाणीसंकट वाढत आहे.

भारतातून वाहणाऱ्या नद्यांमधील पाण्याच्या कमतरतेमुळे पाकिस्तानच्या अनेक भागात पाणीटंचाई वाढली आहे. पाकिस्तान वारंवार आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर हा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न करत आहे. विशेष म्हणजे, दहशतवादाविरुद्ध कोणतीही ठोस कारवाई न करणारा देश आता नैतिकता आणि कायद्याला आवाहन करत आहे. नवीन वर्षात पाकिस्तानने भारताला धमकावण्याचा प्रयत्न करण्याची ही तिसरी वेळ आहे. याआधी, गेल्या चार दिवसांत असीम मुनीर आणि शाहबाज शरीफ यांनी दोन भारतविरोधी विधाने केली आहेत.

पाकिस्तानचे सिंधू पाणी आयुक्त सय्यद मुहम्मद मेहर अली शाह यांनी ४ जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनात, सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा भारताचा दावा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार वैध नाही. असे म्हटले आहे. त्यांच्या मते, हा करार पूर्णपणे लागू असून अशा प्रकारे तो खंडित केला जाऊ शकत नाही.

एप्रिल २०२५ मध्ये काश्मीरमधील पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर, भारताने सिंधू पाणी करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला. प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने ते युद्धासारखे कृत्य असल्याचे म्हटले, परंतु भारताने स्पष्टपणे सांगितले की, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही. भारताने अलीकडेच चिनाब नदीवरील २६० मेगावॅटच्या दुलहस्ती फेज दोन जलविद्युत प्रकल्पाला मान्यता दिली. या निर्णयामुळे पाकिस्तान आणखी घाबरला आहे, कारण पाकला भीती आहे की त्याचा त्यांच्या पाण्याच्या वाट्यावर परिणाम होईल.

पाकिस्तानी वाहिनी जिओ न्यूजच्या कार्यक्रमात बोलताना सय्यद मेहर अली शाह म्हणाले, आंतरराष्ट्रीय करार कायद्यात निलंबन असा कोणताही शब्द नाही. त्यांच्या मते, भारताला माहिती आहे की तो करार रद्द करू शकत नाही किंवा निलंबित करू शकत नाही, म्हणून अशा शब्दांचा वापर केला जात आहे. भारताने आधीच स्पष्ट केले आहे की, पाकिस्तान दहशतवादाविरुद्ध ठोस कारवाई करत नाही तोपर्यंत संबंध सामान्य करणे शक्य नाही. पाण्याच्या प्रश्नावर भारताची भूमिका देखील स्पष्ट आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि नागरिकांच्या जीवनाशी तडजोड केली जाऊ शकत नाही.

## बँक ऑफ अमेरिकेकडून भारताचे कौतुक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बँक ऑफ अमेरिका या बँकेकडून भारतीय अर्थव्यवस्थेची प्रशंसा करण्यात आली आहे. सरकारने अर्थव्यवस्था मजबूत, वेगवान धोरणात्मक निर्णयामुळे अर्थव्यवस्था सुस्थितीत असल्याचे बोफाने आपल्या अहवालात नमूद केले. त्यामुळे मागच्या अहवालातील ७% जीडीपी भाकीत बदलून ते ७.६% पातळीवर बदलण्यात आल्याचे अहवालाने म्हटले आहे. आर्थिक वर्ष २०२७ मध्ये ६.५% वरून ६.८% पातळीवर वाढवण्यात आले आहे.

जीएसटी कपातीनंतर मोठ्या प्रमाणात भारतीय वित्तीय बाजारात क्रेडिट ग्रोथ मोठ्या प्रमाणात होत आहे. वाढलेल्या सायकलचा लाभ बाजारात होत असताना मोठ्या प्रमाणात जीडीपीत सातत्याने सुधारणा होताना गेल्या तीन तिमाहीत आकडेवारीतून स्पष्ट झाले होते. याच पार्श्वभूमीवर बोफाने सरकारच्या परिवर्तनशील निर्णयासह वाढलेले इंधन वापर, वाढलेली ऑटोमोबाईल विक्री तसेच क्रेडिट ग्रोथ या आधारे भारतातील अर्थव्यवस्था तेजीने वाढत असल्याचे म्हटले.

यापूर्वीच भारत सरकारच्या आकडेवारीप्रमाणे सप्टेंबर तिमाहीत भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादन मध्ये इयर ऑन इयर बेसिसवर ८.२% इतकी अनपेक्षित वाढ झाली होती. बोफाच्या मते वित्तीय पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी केलेल्या वारंवार दरकपातीचा फायदा बाजारातील वाढीत झाल्याचे अहवालात म्हटले. अहवालाच्या आधारे, भारताने वित्तीय तूटी मधील शिस्तबद्धता व बाजारातील अस्थिरतेत सुरू ठेवलेली निर्यात यांचाही फायदा भारतातील अर्थव्यवस्थेला झाला.

भारत सरकार फेब्रुवारी महिन्यात जीडीपीची नवी सिरीज सुरु करणार आहे. ज्यामध्ये २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या तिन्हीची आकडेवारी जाहीर करण्यात येईल असे सांगितले जात आहे. अहवालाच्या मते,हे अपग्रेड लवचिक उपभोग, वाढती गुंतवणूक आणि विवेकपूर्ण धोरण व्यवस्थापनामुळे प्रेरित झालेल्या मजबूत मूलभूत आर्थिक सुधारणेचे प्रतिबिंब आहे.

सरकारकडून देण्यात आलेले सततची चलनविषयक सुलभता आणि राजकोषीय प्रोत्साहन या सकारात्मक वाटचालीस कायम ठेवतील अशी अपेक्षा आहे.

## पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांना अटक

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या संदेशखली येथे गेल्या आठवड्यात पोलिस कर्मचाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी आणखी तीन जणांना अटक करण्यात आली आहे, त्यामुळे अटक करण्यात आलेल्यांची एकूण संख्या १२ झाली आहे, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. या प्रकरणात मुख्य आरोपी म्हणून तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते मुसा मोल्ला यांचा भाऊ मुर्तजा हा तिघांमध्ये होता. मुर्तजाचे दोन मुलगे, मोंताझुल मुल्ला आणि मोनोवर हुसेन मुल्ला यांनाही अटक करण्यात आली आहे.

## काँग्रेस माफी मागणार का भाजपाने केली विचारणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** दिल्ली दंगलींवरील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर, भारतीय जनता पक्षाने सोमवारी म्हटले आहे की आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांना जामीन नाकारण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा काँग्रेसला चपराक आहे. तुकडे-तुकडे गँगला पाठिंबा दिल्याबद्दल विरोधी पक्षाने माफी मागावी अशी मागणीही भाजपाने केली. खालिद आणि इमाम यांना भारतातील फुटीरतावादी शक्तींचे "पोस्टर बॉय" संबोधत, भाजपने असा दावा केला की संपूर्ण काँग्रेस यंत्रणा त्यांना "निर्दोष बळी" म्हणून दाखवत आहे जेणेकरून त्यांना वाचवता येईल.

सोमवारी, सर्वोच्च न्यायालयाने २०२० च्या दिल्ली दंगलीतील कट रचल्याप्रकरणी खालिद आणि इमाम यांना जामीन देण्यास नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की त्यांच्याविरुद्ध बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायद्याअंतर्गत प्रथमदर्शनी खटला दाखल करण्यात आला आहे. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहजाद पूनावाला यांनी न्यायालयाच्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर "सत्यमेव जयते" लिहिले. त्यांनी लिहिले की, उमर खालिद आणि शर्जील इमाम यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन नाकारला आहे. उमर आणि शर्जीलपर्यंत पाठिंबा दिल्याबद्दल काँग्रेसने माफी मागावी, असेही त्यांनी म्हटले आहे.

## शबरीमला सोने चोरी प्रकरणी याचिका फेटाळली

# देव आणि मंदिराला तरी किमान हात लावू नका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केरळच्या शबरीमला मंदिरातील सोनं चोरी प्रकरणी देवस्वम बोर्डाचे माजी सदस्य केपी शंकर दास यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका फेटाळण्यात आली आहे. केपी शंकर दास यांची याचिका फेटाळून लावताना खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, तुम्ही देवालाही सोडले नाही. किमान देव आणि मंदिराला तरी हात लावायला नको होता. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले की, शबरीमला अय्यप्पा मंदिरातील कथित सोनं चोरीप्रकरणी देवस्वम बोर्डाचे सदस्य शंकर दास हेही तितकेच जबाबदार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने पुढे म्हटले की, गुन्ह्याचे गांभीर्य असूनही उच्च न्यायालयाने शंकर दास यांच्या आरोग्य आणि वाढत्या वयाचा विचार करून काही सवलती दिल्या आहेत. मात्र खटल्याच्या गुणवत्तेवरून त्यांना दिलासा मिळालेला नाही.

मंदिरातील सोनं चोरी प्रकरण केरळ उच्च न्यायालयात गेल्यानंतर या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे देण्यात आला होता. मंदिरातील सोन्याच्या वस्तू इलेक्ट्रोप्लेटिंग आणि दुरुस्तीसाठी देण्यात आल्या असताना त्यातील सोने चोरी झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. एसआयटीला संशय आहे की, या वस्तूंमधील सोने चोरी करून ते विकण्यात आलेले असावे. या प्रकरणातील मुख्य आरोपी उन्नीकृष्णन पोट्टी याने स्वतःच्या फायद्यासाठी मंदिरातील सोने पळविल्याचा आरोप करण्यात येत आहे.

केरळ उच्च न्यायालयाने दास विरोधात केलेली टिप्पणी हटविण्यास सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश दिपांकर दत्ता आणि न्यायाधीश सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठाने नकार दिला.

केरळ उच्च न्यायालयाने नोंदविलेल्या निरीक्षणानुसार, सोन्याच्या प्लेट्स कथित चोरी आणि फेरफारशी संबंधित गुन्हेगारी कट रचण्याच्या आरोपातून शंकर दास आणि के. विजयकुमार सुटून शकत नाहीत. शंकर दास यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशातील पाच उतारे वगळण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात केली होती. ज्यात त्यांच्याविरुद्ध गंभीर निरीक्षणे होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली.

दरम्यान, केरळ उच्च न्यायालयाच्या देवस्वम खंडपीठाने शबरीमला सोने चोरी प्रकरणाचा तपास पूर्ण करण्यासाठी विशेष तपास पथकाला अतिरिक्त वेळ दिला. एसआयटीने तपासाच्या अंतरिम प्रगतीची माहिती दिल्यानंतर न्यायालयाने ही मुदत सहा आठवड्यांनी वाढवली. आता एसआयटी १९ जानेवारी रोजी अंतरिम तपास अहवाल सादर करणार आहे.

शबरीमला मंदिरातील सोने चोरी प्रकरणातील मुख्य आरोपी उन्नीकृष्णन पोट्टी आणि गोवर्धन यांचा काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांच्याबरोबरचा एक फोटो समोर आला आहे. या फोटोनंतर भाजपाकडून काही प्रश्न उपस्थित करत टिका-टिप्पणी करण्यात आली आहे. भाजपाचे माजी केरळ प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन म्हणाले की, काँग्रेसने या फोटोमागचे सत्य लोकांना सांगावे. शबरीमला मंदिरातील सोने चोरीचे प्रकरण साधेसुधे नाही. त्याचा आंतरराष्ट्रीय तस्करीशी संबंध असू शकतो, असाही अंदाज त्यांनी लावला आहे.